आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१८ ऑगस्ट २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पर्यावरणविषयक कृती कार्यक्रम लोककेंद्री, शाश्वत आणि विकसनशील देशांच्या वास्तवाचा विचार करणारा असावा, यावर भारताचा ब्रिक्स देशांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या बैठकीत भर

- महाराष्ट्रातल्या अर्ज जमा न करणाऱ्या २ कोटींहून अधिक मतदारांची नावं प्रारुप यादीतून वगळली जाणार

- नीट पेपरफुटी प्रकरणातल्या आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईच्या चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडून उच्चस्तरीय समितीची स्थापना

- विदीत गुजराथी, दिव्या देशमुखसह १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर

**आणि**

- श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात भारताचा दुसरा डाव १९३ धावात आटोपला /श्रीलंकेच्या दिवसअखेर ४ बाद ८४ धावा

<><><><><>

पर्यावरणविषयक कृती कार्यक्रम लोककेंद्री, शाश्वत आणि विकसनशील देशांच्या वास्तवाचा विचार करणारा असावा, यावर भारतानं ब्रिक्स देशांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या बैठकीत भर दिला आहे. ग्लोबल साऊथच्या प्रश्नांना प्राधान्य देणं, तसंच सहकार्य आणि शाश्वततेच्या दृष्टिकोनातून ब्रिक्सची पुनर्रचना करणं हे भारताचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव या बैठकीत म्हणाले.

विकसनशील देशांमध्ये बऱ्याचदा व्यापक विकासाच्या प्राधान्यक्रमांचा थेट संबंध पर्यावरणाच्या बदल आणि धोक्यांशी जोडलेला असतो. त्यामुळे होणारा हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, प्रदूषण आणि आपत्तीचा धोका यांबाबत ब्रिक्स देशांमध्ये अधिक सहकार्याची गरज यादव यांनी व्यक्त केली.

<><><><><><>

SIR अर्थात विशेष मतदार यादी पुनरीक्षणाच्या अंतर्गत राज्यातल्या २ कोटींहून अधिक मतदारांनी अर्ज जमा केलेलेच नाही. त्यामुळं प्रारुप मतदार यादीतून त्यांची नाव हटवली जाणार आहेत. SIR च्या अंतर्गत अर्ज जमा करण्याचा काल अखेरचा दिवस होता. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार राज्यात ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार आहेत. त्यापैकी २ कोटी ७ लाख ३ हजार २६८ मतदारांनी SIR च्या अंतर्गत आवश्यक असलेले अर्ज जमा केले नाहीत. एकूण मतदारांच्या तुलनेत ही संख्या २१ टक्क्याहून अधिक आहे. त्यापैकी केवळ सव्वा २ लाख मतदार यादीत सहभागी होण्यासाठी पात्र असतील. १७ लाख ६३ हजार दुबार किंवा अन्यत्र नोंदणी केलेले मतदार आहेत तर सुमारे ७७ लाख कायम स्वरुपी स्थलांतरित झाले आहेत. ७५ लाख ५२ हजारांहून अधिक मतदार BLO ना आढळून आले नाहीत तर ३४ लाख ८१ हजार मतदारांचा मृत्यू झाला होता, असं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं कळवलं आहे. SIR अर्थात मतदार यादी विशेष पुनरीक्षण प्रक्रि, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

२४ ऑगस्टला प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यात नाव नसलेल्या पात्र मतदारांना नमुना ६, घोषणापत्र आणि आवश्यक कागदपत्र जमा करुन मतदार यादीत नाव समाविष्ट करता येईल. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध हो◌णाऱ्या अंतिम मतदार यादीत या मतदारांचे नाव समाविष्ट होऊ शकेल.

अंतिम मतदार यादीतही नाव नसलेल्या मतदारांना त्यानंतर सुद्धा मतदार यादीत नाव नोंदवता येईल, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकारनं अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारच्या सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आता ६० टक्के महागाई भत्ता मिळेल. जानेवारी ते जुलैची थकबाकी ऑगस्ट महिन्याच्या वेतनासोबत दिली जाणार आहे.

**<><><><><>**

पंढरपूरच्या विशेष पुनर्वसन धोरणाला राज्य मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. यामुळं विठ्ठल रुख्मिणी मंदिर परिसरातल्या विकासकामांना गती मिळेल. सुमारे ४ हजार कोटींचा हा आराखडा आहे. याअंतर्गत प्रकल्पबाधितांसाठी विशेष पुनर्वसन धोरण राबवलं जाणार आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या सुमारे साडे ६ हजार कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीलाही राज्य सरकारनं आज मंजुरी दिली. यामुळं गोदावरी खोऱ्यातल्या सिंदफणा नदीवरच्या माजलगाव धरणाच्या कामाला गती मिळेल.

युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप – २०३२ च्या आयोजनाला आवश्यक मदत करायलाही राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

राज्य सरकारनं मीरा भाईंदर ते वसई-विरार मेट्रो मार्गाला मान्यता दिली आहे. या मार्गाची एकूण लांबी २५ किलोमीटर असेल आणि त्यावर १६ स्थानके प्रस्तावित आहेत. पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत याला

मान्यता देण्यात आली. पुणे रिंगरोडच्या विस्तारीकरणाला सरकारनं मान्यता दिली आहे.

<><><><><><>

नवी दिल्लीतल्या नीट पेपरफुटी प्रकरणातल्या आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाईची चौकशी करण्यासाठी उच्च स्तरीय समितीची नेमणूक सर्वोच्च न्यायालयानं केली आहे. महिला आंदोलकांवर झालेल्या कारवाईची चौकशीही ही समिती करेल. सेवानिवृत्त न्यायाधीश, माजी पोलीस महासंचालक आणि सीबीआयच्या माजी संचालकांसह इतरांचा समावेश या समितीत असणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सुर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहन्ना यांच्या खंडपीठानं आज हे आदेश दिले. समितीच्या सदस्यांची नावं उद्या जाहीर केली जाणार आहेत.

<><><><><><>

केंद्र सरकारनं ग्रँडमास्टर विदित गुजराथी आणि दिव्या देशमुख यांच्यासह एकूण १७ खेळाडूंना आज २०२५ चे अर्जुन पुरस्कार जाहीर केले. ॲथलेटिक्स खेळाडू तेजस्विन शंकर, मोहम्मद अजमल व्ही., प्रियांका गोस्वामी, बॅडमिंटनपटू ट्रीसा जॉली, पुल्लेला गायत्री गोपीचंद, मुष्टीयोद्धा नरेंद्र, दिव्यांग नेमबाज धनुष श्रीकांत यांनाही अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे.

फुटबॉल क्षेत्रात भरीव योगदानासाठी आय. अरुमै-नायगम यांना अर्जुन जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. द्रोणाचार्य पुरस्कार नेमबाजी प्रशिक्षक नेहा चव्हाण यांना जाहीर झाला आहे. क्रीडा क्षेत्राच्या प्रोत्साहन आणि विकासात उल्लेखनीय भूमिका बजावणाऱ्या संस्था आणि संघटनांना

दिला जाणारा राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार २०२५ पुण्याच्या आर्मी पॅरालिम्पिक नोड संस्थेला जाहीर झाला आहे.

<><><><><><>

गॉल इथं सुरु असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज चौथ्या दिवसअखेर श्रीलंकेनं ४ बाद ८४ धावा केल्या. विजयासाठी त्यांना आणखी २८८ धावांची गरज आहे. भारताचा दुसरा डाव आज १९३ धावात आटोपला. मात्र पहिल्या डावातल्या १७८ धावांच्या आघाडीमुळे श्रीलंकेपुढं विजयासाठी ३७२ धावांचं आव्हान ठेवता आलं. ऋषभ पंतनं सर्वाधिक ६६ धावा केला. त्यानं आज त्याच्या कसोटी क्रिकेट कारकीर्दितला १०० वा षटकार मारला. अशी कामगिरी करणारा तो जगातला चौथा, तर भारताचा पहिलाच खेळाडू ठरला. श्रीलंकेतर्फे असिता फर्नांडोनं चार, तर प्रबात जयसूर्यानं तीन गडी बाद केले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवातही खराब झाली. त्यांचे आघाडीचे ४ फलंदाज ४७ धावात बाद झाले. आजचा खेळ थांबला तेव्हा कर्णधार धनंजय डिसिल्वा ३१, तर सोनल दिनुशा २५ धावांवर खेळत होता.

<><><><><><>

नवी दिल्लीत इंदिरा गांधी मैदानावर सुरू असलेल्या बी डब्ल्यु एफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या उन्नती हुडा हिने म्यानमारच्या थेत हुतार थुझार हिचा सरळ गेममध्ये पराभव करून महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. आता तिचा सामना कॅनडाच्या मिशेल ली हिच्याशी होईल. महिला दुहेरीत, भारताच्या ट्रेसा जॉली आणि गायत्री

गोपीचंद यांनी उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. या भारतीय जोडीने अमेरिकेच्या लॉरेन लॅम आणि ॲलिसन ली यांचा २१-१५, २१-१२ असा सरळ गेममध्ये पराभव केला. अशित सूर्या आणि अमृता प्रथमेश या भारतीय जोडीला मात्र तुर्कीच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी केलेला युक्तिवाद विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाकारला आहे. आज यवतमाळ इथं बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं….

**होल्ड - बाईट - राहुल नार्वेकर**

(*कपिल सिब्बल हे त्यांच्या पक्षकारासाठी युक्तिवाद करत आहे, ते काय म्हणतात याच्यातून काही सिद्ध होत नाही, मी जी भूमिका घेतली आहे ,मी जो निर्णय दिलेला आहे तो कायद्याच्या चौकटीत राहून दिलेला निर्णय आहे, आणि सुप्रीम कोर्टाने जे निकष दिले, त्या निकषाच्या आत राहून, त्या आधारावरतीच हा निर्णय दिला गेलेला आहे. मी दिलेला निर्णय हा अत्यंत शाश्वत निर्णय आहे, आणि मला वाटत नाही त्यात कोणताही बद्दल होईल म्हणून…* असही राहुल नार्वेकर म्हणाले.)

**<><><><><>**

झारखंडमध्ये गुमला जिल्ह्यात चार नक्षलवाद्यांना अटक केली आहे. अटक झालेल्यांमध्ये झारखंड जनमुक्ती परिषदेचा सदस्य रामदेव लोहरा याचा समावेश आहे. त्याच्यावर पाच लाख रुपयांचं बक्षीस होतं. अटक करण्यात आलेल्यांकडून शस्त्रास्त्र आणि इतर सामग्री जप्त करण्यात आली आहे.

**<><><><><>**

पक्ष मजबूत करण्यासाठी गाव पातळीपासून ते बूथ स्तरापर्यंत अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जनतेशी सातत्यानं संपर्कात रहावे, त्यांच्या अपेक्षा आणि समस्या जाणून घ्याव्यात, असा सल्ला भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी दिला आहे. विशाखापट्टणम इथं आज भाजपाच्या राज्य कार्यकारिणी समितीची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना, कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावं, असंही नबीन यांनी सांगितलं.

//<><><><><><>//